डाळींच्या कणकणातून साकारला बाप्पा!
>> पान 2

१२ फुट मातीचा विघ्नहर्ता: जालन्यात भव्य आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना
>> पान 3

डोणगावमध्ये महालक्ष्मीचे भव्य स्वागत, खंडारे कुटुंबीयांच्या देखाव्याने भाविकांची मने जिंकली
>> पान 4

**सुविचार**
आपल्या मर्यादा ओळखा आणि त्यांना ओलांडण्याचा प्रयत्न करा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 42 ■ मंगळवार, दि. 02 सप्टेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



दिग्दर्शक अनुराग कश्यपनं निशांचीतील प्रमुख कलाकार ऐश्वर्य ठाकरेचं केलं कौतुक
आतील पान

# मुंबईतील मराठा आंदोलन हाताबाहेर गेलंय, आता मुंबईत कोणालाही येऊ देऊ नका

**हायकोर्टाच्या सरकारला सूचना**



**मुंबई/प्रतिनिधी : मराठा आरक्षण आंदोलनाचा वाद आता न्यायालयात पोहोचला असून ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी आझाद मैदानात सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मनोज जरांगे पाटील आणि वीरेंद्र पाटील यांनी आदेशाचं उल्लंघन केल्याचा दावा याचिकाकर्त्यांने कोर्टात केला आहे. आंदोलकांकडून देखील आज उच्च न्यायालयात बाजू मांडण्यात आली असून कैलास खांडबहाले यांच्याकडून हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली आहे.**



त्यामुळे, जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला यापुढे परवानगी मिळणार की नाही हे पाहावे लागेल. दरम्यान, हायकोर्टाने काही महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले असून मुंबईतील मराठा आंदोलन हाताबाहेर गेलं आहे, आता कोणालाही मुंबईत येऊ देऊ नका, असे निर्देशच न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

मुंबईत संपूर्ण उच्च न्यायालय परिसराला घेराव घालण्यात आला आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या गाड्या अडवण्यात आल्या आहेत, त्यांना उच्च न्यायालयात येण्यापासून अडवण्यात आल्याचं न्यायमूर्तींकडून स्वतः सांगण्यात आलं. तसेच, मुंबईत अजून आंदोलनकर्ते येत आहेत, त्यांना कसं अडवणार अशी विचारणाही मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली आहे. न्यायालयाने आजच्या सुनावणी राज्य सरकारला चांगलंच सुनावलं. दरम्यान, सुनावणीदरम्यान हायकोर्टाच्या बाहेर मराठा आंदोलक अनेक ठिकाणी उभे असल्याचं पाहायला मिळालं.

एमी फाऊंडेशनने दाखल केलेल्या याचिकेत मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिले होते. मात्र, त्या आदेशाच उल्लंघन झाल्याचं याचिकाकर्त्यांकडून कोर्टाला सांगण्यात आलं. मनोज जरांगे पाटील आणि वीरेंद्र पाटील यांनी आदेशाचं उल्लंघन केल्याचा दावा याचिकाकर्त्यांने कोर्टात केला आहे. तर, आंदोलकांनी मुंबई अडवून ठेवली असल्याचा दावा ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी कोर्टात केला आहे. आझाद मैदान पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी श्रीकांत अडाते हेही उच्च न्यायालयात उपस्थित होते. दरम्यान, आंदोलकांकडून देखील आज उच्च न्यायालयात बाजू मांडण्यात आली असून कैलास खांडबहाले यांच्याकडून हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने न्यायालयात मनोज जरांगे पाटील यांचा अर्ज वाचून दाखवला.

या अर्जाच्या सुरुवातीलाच आमरण उपोषणाचा उल्लेख आहे. मात्र, नियमात आमरण उपोषणाला परवानगी नसल्याने उच्च न्यायालयाने राज्य सरकारला विचारणा केली आहे. अर्जाच्या खाली जरांगे पाटील यांची सही असल्याचं तुम्ही सांगू शकता का? मनोज जरांगे पाटील यांना नोटीस बजावण्यात आली आहे का? अशीही विचारणा मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली आहे. गेल्या सुनावणीत नोटीस बजावण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले होते.

केवळ आझाद मैदानात आंदोलनाची परवानगी देण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्यांने केला आहे. तसेच, दुसरीकडे आंदोलन करण्यास परवानगी नाही, परवानगी फक्त एका दिवसासाठी देण्यात आली होती, अशी बाजू राज्य सरकारने मांडली. आंदोलकांकडून लिहून (णपवर्शीींरज्ञळपस) देताना सगळ्या अटी पाळण्यात येतील असं मान्य केलं होतं, त्याआधारे परवानगी देण्यात आली होती अशी माहिती महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयात दिली. कोर्टाने नियमात राहून आंदोलन करण्याची परवानगी दिली होती, त्यानुसार परवानगी देण्यात आली होती. आझाद मैदान हे आंदोलनासाठी आरक्षित आहे. मात्र, त्याव्यतिरिक्त कुठेही आंदोलन करण्यास परवानगी नाही, असेही सरकारने म्हटले आहे.

मुंबईतील मराठा आंदोलनाबाबत मी २९ तारखेला तक्रार दिली, आझाद मैदानाच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना फोन केला आणि त्यांना परिस्थिती जाणीव करून दिली. लेखी तक्रार दिली आणि गुन्हा दाखल करण्यासाठी अर्ज केला. पण, पोलिसांनी कारवाई केली नाही, असे गुणरत्न सदावर्त यांनी न्यायालयात म्हटले. तसेच, आज राज्याचा मुख्यमंत्री मराठा नाही म्हणून हे सुरू आहे, असेही सदावर्ते नी म्हटलं.

## राज्य सरकार काय म्हणाले?

गणेशोत्सवात कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणं पोलिसांसाठी देखील कठीण आहे. तरी आम्ही समतोल पाळण्याचा प्रयत्न करतोय जेणेकरून कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही. शनिवारी आणि रविवारी आंदोलनाला परवानगी देण्यात आलेली नाही, केवळ ५ हजार आंदोलकांना परवानगी देण्यात आली होती. राज्य सरकारने दिलेल्या परवानगीवर याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतला आहे. तसेच, ध्वनिक्षेपकांच्या वापरला विनापरवाना वापरण्यास परवानगी दिली नाही, आंदोलनाला केवळ सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतच परवानगी देण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी अटी शर्ती पाळून परवानगी मागितली होती, म्हणून त्यांना परवानगी देण्यात आली होती. त्यातही, ५००० लोकांचा जमाव असेल आणि १५०० वाहन असतील, असे सांगण्यात आले होते. तुम्ही सगळ्या नियमांच उल्लंघन केल्याचं राज्य सरकारने वेळो-वेळी जरांगे पाटील यांना सांगितलं. बैलगाड्या चावल्या जात आहेत, शहर एक खेळाचं मैदान झालं आहे, अशी माहिती राज्य सरकारने दिली. आंदोलक सगळीकडे आहेत, फ्लोरा फाऊंटनमध्ये आहेत, सीएसएमटी स्थानकात आंदोलक आहेत, असे म्हणत राज्य सरकारकडून उच्च न्यायालयात फोटोही दाखवण्यातआले. त्यामुळे, याचा काय तोडगा काढणार अशी विचारणा उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली होती. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयात देखील आंदोलनकर्त्यांचा आवाज ऐकू येऊ लागल्याने उच्च न्यायालयाने आश्र्चर्य व्यक्त केलं.

## मराठे आक्रमक! सदावर्ते, हाकेंसाठी रोगरची बाटली घेऊन मुंबईच्या दिशेने रवाना



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** चार दिवसांपासून सुरू असणाऱ्या मराठा आरक्षण मुद्द्यावरून होणाऱ्या आंदोलनाका गंभीर वळण मिळाले असून, आंदोलकांनी काही ठिकाणी आक्रम क भूमिका घेत दक्षिण मुंबईत रेल्वे स्थानके, रस्त्यांवर ठिय्या मांडल्यानंतर शासनाने आरक्षणासंदर्भातील तोडगा काढण्यासाठीच्या हालचालींना वेग दिला आहे. तर, तिथं मराठा कार्यकर्त्यांनी गुणरत्न सदावर्ते आणि ओबीसी लक्ष्मण हाके यांची मराठा आरक्षणासंदर्भातील भूमिका पाहता त्यांच्या निषेधार्थ भूमिका घेतल्याचं पाहायला मिळत आहे. गुणरत्न सदावर्ते आणि लक्ष्मण हाके यांच्यासाठी रोगरची बाटली घेऊन मराठा आंदोलक मुंबईच्या दिशेने निघाले असल्याची माहिती समोर आली आहे. पुण्याच्या खेड तालुक्यातून मुंबईच्या दिशेनं असलेल्या मराठा बांधवांसाठी जेवणाचा शिधा घेऊन जात असताना मराठा बांधवाकडून सदावर्ते आणि हाकेंसाठी काळजी घेण्याचा (उपरोधिक) प्रयत्न करण्यात आला आहे. सदावर्ते यांची दृष्टी खराब झाली असून त्याचे डोळे दुरुस्तीसाठी त्यांना रोगरची बाटली घेऊन मराठा आंदोलक मुंबईच्या दिशेने निघाल्याचं मराठा कार्यकर्त्यांनी सांगितलं. रोगाच्या बाटलीतील औषध घेतल्यानंतर मराठ्यांकडे पाहण्याची दृष्टी बदलेल आणि हाकेंच्या म नामध्ये विकृती निर्माण झालीय त्यांनीसुद्धा या रोगरचे दोन तीन घोट घ्यावेत म्हणजे त्यांच्या मनातील बुद्धीत परिवर्तन होईल, असं मराठा आंदोलक म्हणताना दिसले.

## शरद पवार नाशिकमधून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचं रणशिंग फुंकणार



**भव्य शेतकरी मोर्चाही काढणार**

**मुंबई/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने जोरदार तयारी सुरू केली आहे. या पार्श्र्वभूमीवर १४ व १५ सप्टेंबर रोजी शरद पवार दोन दिवसांच्या नाशिक जिल्हा दौऱ्यावर राहणार आहेत. यामध्ये पक्षाचं विशेष कार्यकर्ता शिबिर, तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर भव्य शेतकरी मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. १४ सप्टेंबरला नाशिक शहरात पक्षाचं विशेष कार्यकर्ता शिबिर होणार असून, या शिबिरात पक्ष संघटना बळकट करण्यासोबतच आगामी निवडणुकांसाठी रणनीती आखली जाणार आहे. या शिबिरात शरद पवार यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. शिबिराच्या माध्यमातून पक्षाने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

१५ सप्टेंबर रोजी नाशिक शहरात भव्य शेतकरी महामोर्चा काढण्यात येणार आहे. कर्जमाफी, हमीभाव, कांदा दराचा प्रश्र्न, पीक विमा, ऊस उत्पादकांचे प्रश्र्न, अवकाळी पाऊस, ओला दुष्काळ, तसेच शेतकऱ्यांवर लादले जाणारे निर्बंध, अशा ज्वलंत प्रश्र्नांवर सरकारला जाब विचारणारा मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्र्न थेट सरकारपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या महामोर्चात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, राज्यातील आणि देशातील विविध नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या प्रमाणात शेतकरी सहभागी होणार आहेत.

या आंदोलनाची सुरुवात नाशिक येथून होत असली, तरी ही लढाई पुढे जिल्हा, तालुका आणि शहर पातळीवर नेण्यात येणार असल्याचे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी काही दिवसांपूर्वीच स्पष्ट केले आहे. त्यांनी सांगितले की, राज्य कार्यकारिणीची बैठक नुकतीच शरद पवारांच्या उपस्थितीत पार पडली असून, त्यात पक्ष संघटन मजबूत करण्याबरोबरच सर्वसामान्यांच्या प्रश्र्नांसाठी रस्त्यावर उतरायचे धोरण ठरवण्यात आले आहे.

शिंदे यांनी पुढे सांगितले की, शेतकऱ्यांच्या उत्पादनांना हमीभाव मिळत नाही, सरकारने जाहीर केलेल्या दरापेक्षा कमी दराने कांदा, तूर, मूग यांची खरेदी होत आहे. सरकारने हमीभावानुसार तत्काळ खरेदी सुरू करावी, तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी लवकरात लवकर करावी, यासाठी हे आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.

# आपण यांना पाहिलंत का? नांदेडमध्ये सत्ताधाऱ्यांविरोधात सकल मराठा समाज आक्रमक, आमदार-खासदारांचे बॅनर झळकले

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या काही दिवसांपासून आंदोलनरत असलेले मनोज जरांगे पाटील यांना सत्ताधारी आमदार आणि खासदारांनी पाठिंबा न दिल्याने, नांदेड शहरात सकल मराठा समाजाने थेट निषेधात्मक पवित्रा घेतला आहे. आज सकाळपासूनच शहराच्या प्रमुख रस्त्यांवर आणि चौकांमध्ये ''आपण यांना पाहिलंत का?'' अशा मथळ्याचे बॅनर लावण्यात आले असून, सत्ताधारी आमदार-खासदारांचा निषेध करण्यात आला आहे.






सकल मराठा समाजाच्या वतीने लावण्यात आलेल्या या बॅनर्समध्ये संबंधित सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या फोटोसह त्यांचे नाव आणि ''आपण यांना पाहिलंत का?'' असा प्रश्न विचारण्यात आला आहे. हे बॅनर नागरिकांचे लक्ष वेधत असून, सामान्य जनतेमध्येही यावर तीव्र चर्चा सुरू आहे.

सकल मराठा समाजाच्या प्रतिनिधींनी यावेळी सांगितले की, हे आमदार आणि खासदार मराठा समाजाच्या पाठिंब्यावर निवडून आले. परंतु, आता जेव्हा समाजासाठी रस्त्यावर उतरायची वेळ आहे, तेव्हा हे नेते कुठे आहेत, असा प्रश्न आम्ही विचारत आहोत. जर त्यांना समाजाचा विसर पडल असेल, तर त्याला जनता योग्य वेळी उत्तर देईल.''

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा द्यावा मागणी

आंदोलकांनी यावेळी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जर हे लोकप्रतिनिधी खरंच समाजाचे आहेत, तर त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला उघडपणे पाठिंबा द्यावा. अन्यथा, आगामी काळात होणाऱ्या परिणामांना ते स्वतः जबाबदार राहतील.''

या बॅनरवर ''हे कुठेही दिसले, तर कृपया आम्हाला कळवा'' असे आवाहनही करण्यात आले आहे, जेथून समाजाची निराशा आणि संताप अधिक स्पष्ट होतो. हे केवळ निषेध नाही, तर लोकशाही पद्धतीने लोकप्रतिनिधींना जबाबदार धरण्याचा प्रयत्न आहे.

राजकीय पटलावर खळबळ

सामाजिक चेतनेचा एक दृढ संदेश सकल मराठा समाजाने या उपक्रमातून फक्त निषेध व्यक्त केला नाही, तर लोकशाहीत नागरिकांच्या सहभागाचे सामर्थ्य दाखवून दिले आहे. प्रतिनिधींनी समाजासाठी जागरूक राहणे गरजेचे आहे, हा संदेश त्यांनी या माध्यमातून दिला आहे.

नांदेडमध्ये सकल मराठा समाजाने सत्ताधारी आमदार व खासदारांच्या निष्क्रियतेचा जाहीर निषेध करत एक ठोस सामाजिक आणि राजकीय संदेश दिला आहे. या बॅनर आंदोलनातून ''लोकशाहीमध्ये जनतेची निरीक्षणशक्ती आणि जागरूकता किती

या बॅनर प्रकरणामुळे नांदेडसह राज्यातील राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली असून, आगामी काळात याचा मोठा राजकीय परिणाम होण्याची शक्यता आहे. सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर आता संपूर्ण समाजाचे लक्ष केंद्रित झाले आहे.

## चीनने विश्वासघातही स्वभाव सोडला तरच मैत्री शक्य

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या चीनच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनिपिंग यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही जागतिक नेत्यांत जवळपास पन्नास मिनिटे चर्चा झाली. या भेटीत अनेक विषयांवर चर्चा झाली. दोन्ही देशात बिघडलेले संबंध सुधारण्यावर या भेटीत भर देण्यात आला. या दौऱ्यात दोन्ही देशात करार होण्याची शक्यता आहे. २०१८ नंतर नरेंद्र मोदी यांचा हा पहिलाच चीन दौरा आहे. मोदींच्या या दौऱ्याकडे भारताचेच नाही तर जगाचे लक्ष लागले आहे कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क ( टॅरीफ ) लावल्यानंतर भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे बिघडले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी केवळ भारतावरच नाही तर चीन, मेक्सिको, कॅनडा, ब्राझील या आणि यासारख्या अन्य देशांवर देखील टॅरीफ लावले आहे. त्यामुळे भारतासह या देशातही अमेरिकेविरुद्ध प्रचंड नाराजी आहे. मात्र सर्वात जास्त चीड ही भारत आणि चीन या देशात आहे भारत आणि चीन या दोन्ही देशांवर अमेरिकेने प्रचंड टॅरीफ लावले आहेत त्यामुळे अमेरिकेच्या या दडपशाही विरुद्ध हे देश एकत्र येत आहे त्यामुळेच हा दौरा विशेष महत्वाचा ठरतो. काही दिवसांपूर्वीच भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर रशियाच्या दौऱ्यावर गेले होते तिथे दोन्ही देशांनी मिळून अमेरिकेची दडपशाही मोडून काढण्याचा निर्णय घेतला. रशिया पाठोपाठ आता चीनशी ही भारत सलगी वाढवत आये त्यामुळे अमेरिकेच्या विरोधात या तीन देशांची युती होत आहे असे मानले जात आहे. चीन आणि रशिया या जागतिक महासत्ता अमेरिकेच्या विरोधातच होत्या भारताचे अमेरिकेशी घनिष्ट संबंध होते मात्र डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोर स्वभावामुळे भारतही आता अमेरिकेच्या विरुद्ध जाऊन चीन आणि रशिया यांच्या सोबत गेला तर त्याचे जागतिक राजकारणावर दुरगामी परिणाम होतील. अमेरिकेला शह देण्यासाठी हे तीन देश एकत्र आले तर अमेरिकेला निश्चितच पर्याय निर्माण होईल त्यामुळेच या दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. भारत आणि रशिया हे पारंपरिक मित्र राष्ट्र आहे. संकटाच्या काळी या दोन्ही देशांनी एकमेकांना मदत केली आहे याउलट भारत आणि चीन हे एकमेकांचे कधीच मित्र नव्हते. भारत आणि चीनचे शत्रुत्व जगजाहीर आहे. चीनने भारताला कायम शत्रू मानले आहे. भारताने चीनशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचाच प्रयत्न केला चीनने मात्र भारताचा विश्वासघातच केला आहे. १९६२ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी तर हिंदी चिनी भाई भाई म्हणत चीनशी मैत्रीचा हात पुढे केला होता मात्र चीनने भारताचा केसाने गळा कापत भारतावर आक्रमण करत भारताचा काही भूभाग बळकावला. त्यानंतरही चीनने अनेकदा भारताच्या खोड्या काढल्या. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात चिनी आणि भारतीय सैनिकांची झालेली झपाटपट अजूनही ताजीच आहे या झटापटीत भारताचे २० जवान शहीद झाले होते. चीन भारताच्या गलवान खोऱ्यासह अरुणाचल प्रदेशावर दावा सांगतो. अरुणाचल प्रदेश हा चीनचाच भूभाग आहे असे चीन म्हणतो त्यामुळेच चीनशी भारताचे वैर आहे. भारत पाकिस्तान युद्धात चीनने कायम पाकिस्तानची बाजू घेतली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या सिन्दुर संघर्षात चीनने पाकिस्तानची उघडपणे बाजू घेतली होती इतकेच नाही तर पाकिस्तानने या संघर्षात वापरलेले लष्करी साहित्यही चीननेच पुरवले होते म्हणूनच चीनवर भारत कसा विश्वास ठेवणार असा प्रश्न पडतो. चीन हा जगातील सर्वात अविश्वासू देश आहे. जेव्हा जेव्हा भारताने चीनशी मैत्रीचा हात पुढे केला त्या त्या वेळी चीनने भारताचा विश्वासघात केला त्याचीच पुनरावृत्ती आता होईल की काय अशी शंका उपस्थित केली जाते आणि ती रास्तही आहे पण बदललेल्या राजकीय परिस्थितीत या दोन्ही देशांना एकत्र येण्याशिवाय पर्यायही नाही. अमेरिकेला शह द्यायचा असेल तर भारत, रशिया आणि चीन यांना एकत्र यावेच लागेल. जागतिक राजकारणातले हे तीन देश एकत्र येत आहे हे स्वागतार्ह आहे. भारत, रशिया आणि चीन यांचा त्रिकोण झाला तर तर त्याचा जागतिक राजकारणावर दुरगामी परिणाम होणार हे निश्चित. मात्र त्यासाठी यातील तिसरा कोण असलेल्या चीनने जर आपला विश्वासघातकी स्वभाव सोडून दिला तरच हे शक्य आहे. अमेरिकेला शह देण्याची चीनची खरोखर इच्छा असेल तर त्यांनी मनापासून भारताशी मैत्री करायला हवी आणि आपल्यावर लागलेले विश्वासघातकी हे बिरूद काढून टाकायला हवे. मागील अनुभव पाहता हे होईल असे छातीठोकपणे कोणी सांगू शकणार नाही मात्र कोठून तरी सुरवात झाली हे देखील सुचिन्ह म्हणावे लागेल. दोन्ही देशांना मजबुरीने का होईना एकत्र यावे लागत आहे. आता एकत्र राहायचे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करायचे हे चीनच्या हातात आहे ही एक सु संधी आहे. या संधीचे सोने करायचे की नेहमीप्रमाणे माती करायची हे चीनच्या हातात आहे.

# डाळींच्या कणकणातून साकारला बाप्पा!

## वाशिमच्या कारंजा शहरात श्री बाल हौसी गणेश मंडळाची आगळी-वेगळी निर्मिती

दैनिक आपला विदर्भ

**कारंजा /कार्यालय प्रतिनिधी:** जिथे अनेक मंडळं भव्य डेकोरेशन, डीजे आणि रोषणाईसाठी लाखो रुपये खर्च करतात, तिथे वाशिम जिल्ह्यातील कारंजा शहरातील श्री बाल हौसी गणेश मंडळाने यावर्षीची गणेशोत्सवाची संकल्पना संपूर्णतः पर्यावरणपूरक आणि सर्जनशीलतेने भारलेली ठेवली आहे. त्यांनी १० ते १२ प्रकारांच्या डाळींपासून साकारलेली एक अद्वितीय आणि देखणी गणेशमूर्ती उभारली आहे.

कृत्रिमतेला दूर ठेवून सर्जनशीलतेला सलाम! या मूर्तीच्या निर्मितीमध्ये मुख्यतः उडीद, मसूर, चणा, मूग, मटकी, हरभरा, तूर आदी डाळींचा वापर करण्यात आला आहे. ही डाळं केवळ मूर्तीच्या पृष्ठभागावर नव्हे, तर हातातील लाडू, नखं, मुकुट, हार इथपर्यंत वापरली गेली आहेत. मूर्तीचं सौंदर्य आणि बारकावे इतके प्रभावी आहेत की पाहणाऱ्यांना ती एखाद्या डिझायनर शिल्पासारखी




वाटते.

१५ दिवसांची मेहनत, ८ फूट उंच सर्जन या अनोख्या उपक्रमामागे कलावंत अमित करे यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. ''सर्वप्रथम शाडू मातीचा सांगाडा तयार केला, त्यावर हाताने डिझाईन तयार करून, एकेक डाळ काटेकोरपणे चिकटवली. मूर्तीच्या प्रत्येक भागात एक वेगळी डाळ वापरली गेली आहे,'' असे ते सांगतात. ही मूर्ती १५ दिवसांच्या अथक परिश्रमातून साकारली गेली असून तिचं वजन १०० किलोहून अधिक आहे आणि उंची सुमारे ८ फूट आहे.







### डाळींचा उपयोग केवळ खाण्यासाठी नाही!

या मूर्तीच्या माध्यमातून डाळींचा उपयोग केवळ पोषणासाठीच नव्हे, तर कलेसाठीही किती प्रभावीपणे होऊ शकतो, हे सिद्ध झाले आहे. या मूर्तीमुळे 'पुनर्विचार पुनर्वापर पर्यावरणपूरकता' या त्रिसूत्रीला मूर्त रूप मिळाले आहे.

### ही मूर्ती का विशेष आहे?

- डिझायनर मूर्तीसारखी अचूक आणि सूक्ष्म कलाकारी पूर्णतः शाडू माती व नैसर्गिक डाळींचा वापर
- १०० किलोहून अधिक वजन, ८ फूट उंच १५ दिवसांच्या मेहनतीतून साकार
- डीजे आणि रोषणाईऐवजी समाजाला पर्यावरणाचा संदेश

ही मूर्ती विसर्जनानंतर माती आणि डाळी स्वरूपात सहज विघटित होईल, ज्यामुळे जलप्रदूषण टाळले जाईल. डाळींचा काही भाग पक्ष्यांसाठी अन्न म्हणूनही वापरता येईल.

अशा संकल्पनांच्या माध्यमातून गणेशोत्सव अधिक अर्थपूर्ण, कलात्मक आणि पर्यावरणस्नेही बनतो, हे निश्चित.

**''डीजे नव्हे, तर संदेश हवा!''**

मंडळाचा संकल्प मंडळाचे सदस्य सुमेत येवतेकर यांनी सांगितले, ''गणेशोत्सव हा सण केवळ उत्सव नव्हे, तर एक सामाजिक संदेश देण्याची संधी आहे. त्यामुळे आम्ही डीजे, गर्दी आणि खर्चीक डेकोरेशन टाळून एक सामाजिक संदेश देण्याचं ठरवलं.'' त्यांच्या या उपक्रमामुळे कारंजा शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची नवी प्रेरणा मिळाली आहे.

# कूडो राज्यस्तरीय स्पर्धेत आयुष गवईचा झंझावात; बुलडाणा-जालना दोन्ही जिल्ह्यांचा गौरव

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** कूडो असोसिएशन महाराष्ट्र तर्फे आयोजित राज्यस्तरीय कूडो चॅम्पियनशिप २०२५ मध्ये बुलडाणा जिल्ह्याचा आयुष गौतम गवई याने दमदार कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. अवघ्या सातवीत शिकणाऱ्या या छोट्या खेळाडूने अंतिम फेरीपर्यंत मजल मारत रौप्य पदक आपल्या नावे केले. त्याच्या या यशामुळे बुलडाणा व जालना या दोन्ही जिल्ह्यांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

आयुष हा मूळ बुलडाणा जिल्ह्यातील असून त्याचे आई-वडील शिक्षक व्यवसायात आहेत. त्यांचा कामानिमित्त जालना जिल्ह्यातील वास्तव असल्याने आयुषचे बालपण जालन्यातच गेले आहे. सध्या तो पोद्दार इंग्लिश स्कूल, जालना येथे इयत्ता सातवीत शिक्षण घेत आहे. शैक्षणिक अभ्यासाबरोबरच कूडो खेळातही तो उज्वल कामगिरी करत आहे.



या राज्यस्तरीय चॅम्पियनशिपमध्ये राज्यभरातून अनेक ताकदवान खेळाडूंनी सहभाग घेतला होता. आयुषने आपली जिद्द, वेग, कौशल्य आणि आत्मविश्वास दाखवत उपांत्यपूर्व, उपांत्य फेरीत प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले आणि थेट अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम सामन्यात त्याने आक्रमक झुंज दिली, परंतु अनुभवी प्रतिस्पर्ध्याविरुद्ध थोडक्यात पराभव स्विकारावा लागला. त्यामुळे त्याला रौप्य पदक मिळाले.

आयुषच्या या यशामध्ये प्रशिक्षक दत्ता पवार सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आयुषने आपल्या कौशल्यात आणखी धार आणली आणि राज्यस्तरावर आपली छाप उमटवली.

आयुषच्या या यशामुळे बुलडाणा आणि जालना या दोन्ही जिल्ह्यांचा क्रीडा क्षेत्रातील मान उंचावला आहे. स्थानिक पातळीवर त्याच्या कामगिरीचे कौतुक होत असून अनेकांनी त्याला भविष्यातील ''सुवर्णवीर'' म्हणून गौरवले आहे. ''आयुष हा मेहनती, शिस्तप्रिय आणि आत्मविश्वासू विद्यार्थी आहे. लहान वयातच त्याने राज्यस्तरीय पातळीवर आपली छाप पाडली आहे. भविष्यात तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्कीच चमकेल,'' असा विश्वास त्याच्या शाळेच्या शिक्षकांनी व्यक्त केला आहे.

कूडो हा कराटे प्रकारातील खेळ असून त्यासाठी शारीरिक ताकद, वेग, मानसिक संतुलन आणि धैर्य या सर्वांचा कस लागतो. या खेळात आयुषने लहान वयातच प्राविण्य मिळवून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.

त्याच्या या यशामुळे बुलडाणा व जालना जिल्ह्यांत आनंदाचे वातावरण असून शाळा प्रशासन, शिक्षकवर्ग, सहाध्यायी विद्यार्थी, पालक आणि स्थानिक नागरिकांनी त्याचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. आगामी काळात आयुष गवईने सुवर्णपदक जिंकून देशाचे नाव उज्ज्वल करावे, अशी सर्वत्र अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मराठा आंदोलक आक्रमक, लिंबागणेश येथे अंबाजोगाई-अहिल्यानगर महामार्गावर रास्ता रोको

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी:** बीड जिल्ह्यात मराठा आरक्षणाच्या लढ्याने पुन्हा एकदा उग्र रूप धारण केले आहे. अंबाजोगाई-अहिल्यानगर महामार्गावर लिंबागणेश परिसरात आज सकाळपासून मराठा समाजाच्या शेकडो आंदोलकांनी रास्ता रोको करत जोरदार घोषणाबाजी केली. मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून पाणी त्याग करून कडक उपोषणाला सुरुवात केल्याच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन अधिक तीव्र झालं आहे.

आंदोलकांनी महामार्गावर ठिय्या मांडत ''एकच नारा, एकच हुंकार मराठा आरक्षण आमचा अधिकार'' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. वाहनांची दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर रांग लागली असून, नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. पोलिस प्रशासनाने घटनास्थळी दाखल होऊन आंदोलकांशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला, मात्र आंदोलक आपली मागणी पूर्ण होईपर्यंत मागे हटण्याच्या मनःस्थितीत नाहीत.

आंदोलनकर्त्यांचे म्हणणे:

मनोज जरांगे पाटलांनी जे आंदोलन सुरू केले आहे, ते फक्त त्यांच्या आरक्षणासाठी नाही, तर संपूर्ण मराठा समाजासाठी आहे. जर शासनाने यावेळीही दुर्लक्ष केलं, तर आमचं आंदोलन आणखी तीव्र होईल.'' मराठा समाज बांधव

प्रशासकीय हालचाली

प्रशासनाकडून आंदोलकांना शांततेत मार्ग काढण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. मात्र, आंदोलकांनी सरकारकडून ठोस निर्णय येईपर्यंत महामार्ग सोडणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे.

मनोज जरांगे पाटील यांचं पाणी न घेणं आणि त्यांचा आरक्षणासाठीचा कठोर पवित्रा लक्षात घेता, राज्यभरातील मराठा समाज अधिक आक्रमक होत असल्याचं चित्र आहे. बीडमधील ही घडामोड देखील त्या असंतोषाचा भाग मानली जात आहे.

# मेहकर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आदिवासी आश्रमशाळा वरदडा येथे वह्या व खाऊ वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** वरदडा, ता. मेहकर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वाढदिवसानिमित्त, मेहकर तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने सामाजिक बांधिलकी जपत समशेर सिंग पारधी आदिवासी आश्रम शाळा, वरदडा येथे विद्यार्थ्यांना वह्या व खाऊ वाटपाचा कार्यक्रम अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाला.

या उपक्रमाचे अध्यक्षस्थान काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिगंबररावजी मवाळ साहेबांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून मा.कृषी सभापती नंदू भाऊ बोरे, मेहकर तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रदीप बापू देशमुख, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाजीम भाई कुरेशी, जिल्हा सरचिटणीस वसंतराव बापू देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष, किसान काँग्रेस कमिटी विनायकराव टाले, डॉ. भरत आल्हाट, मा. पंचायत समिती सदस्य आशिष बापू देशमुख, जिल्हा युवक काँग्रेस सचिव श्रीधर लहाने, ज्येष्ठ नेते शरद भाऊ नवले व रमेश सिंग पारधी यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य वह्या, पेन तसेच खाऊ वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंदांनी यासाठी उपस्थित मान्यवरांचे विशेष आभार मानले. विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त करत काँग्रेस कमिटीच्या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी बोलताना मान्यवरांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने घेतलेले



सामाजिक उपक्रम व गोरगरिबांसाठी चालविलेली कार्यप्रणाली याचा विशेष उल्लेख केला. आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे संयोजन मेहकर तालुका काँग्रेस कमिटीने केले. परिसरातील ग्रामस्थांनी, शाळेच्या पालकवर्गाने व विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# १२ फुट मातीचा विघ्नहर्ता: जालन्यात भव्य आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना

## काद्राबाद परिसरातील विघ्नहर्ता गणेश मंडळाचा अभिनव उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**जालना/विशेष प्रतिनिधी:** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरात भक्ती, उत्साह आणि संस्कृतीचा अनोखा संगम पाहायला मिळत आहे. याच दरम्यान, काद्राबाद भागातील विघ्नहर्ता गणेश मंडळाने यावर्षी पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारी एक १२ फूट उंच काळ्या मातीची भव्य गणेशमूर्ती साकारली आहे. ही मूर्ती सध्या भाविकांचं प्रमुख आकर्षण ठरत असून, तिच्या अनोख्या बनावट आणि भव्यतेमुळे संपूर्ण परिसरात ती चर्चेचा विषय ठरली आहे.

मातीपासून साकारलेला बाप्पा नैसर्गिकतेचं प्रतीक ही गणेशमूर्ती कोणत्याही रंग, प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा कृत्रिम साहित्यांशिवाय पूर्णतः काळ्या मातीपासून बनवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ही मूर्ती छत्तीसगड राज्यातील रायपूर येथून खास बनवून मागवण्यात आली आहे. पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्याच्या उद्देशाने ही मूर्ती उभारण्यात आली असून, विसर्जनानंतरही ती सहजपणे विघटित होईल आणि निसर्गात पुन्हा सामावून जाईल, असा विश्वास मंडळाने व्यक्त केला आहे.

विघ्नहर्ता मंडळाचा संकल्प भक्ती आणि जबाबदारीचा संगम मंडळाचे प्रमुख पदाधिकारी सूरज वाळेकर म्हणाले, ''प्रत्येक वर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. पण यंदा आम्ही काही वेगळं करायचं ठरवलं. त्यामुळे १२ फुटी इको-फ्रेंडली मूर्ती साकारून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा आमचा प्रयत्न आहे.''



मंडळाने अत्यंत आकर्षक संजावट, सुंदर रोषणाई आणि सुसज्ज मंडप यामार्फत गणेशभक्तांना एक भावनिक आणि अध्यात्मिक अनुभव देण्याची तयारी केली आहे. गणेशस्थापनेच्या पहिल्याच दिवशी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून आली.

सांस्कृतिक उपक्रमांची रेलचेल गणेशोत्सवाच्या काळात विघ्नहर्ता गणेश मंडळाने विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. लहान मुलांसाठी स्पर्धा, महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम, रक्तदान शिबिर, स्वच्छता जनजागृती आणि भक्तिसंगीताचे कार्यक्रम अशा विविध उपक्रमांची रूपरेषा तयार करण्यात आली आहे.

**भाविकांचं म्हणणं...**

हे बाप्पा खरोखर वेगळे वाटतात. भव्य मूर्ती असूनही ती नैसर्गिक मातीची आहे, हे पाहून खूप समाधान वाटतं,'' असं भाविक पूजा देशमुख यांनी सांगितलं. ''मुलांना पर्यावरणाविषयी शिकवायचं असेल, तर अशा उपक्रमांतून त्यांना प्रेरणा मिळते,'' असं एक पालक रमेश पवार म्हणाले.

**१२ फुटी मातीचा गणपती जालना गणेशोत्सव २०२५ ची खास ओळख!**

काद्राबाद येथील हा मंडप सध्या शहरातील नागरिकांसाठी एक प्रमुख आकर्षणबिंदू ठरला असून, उत्सवाच्या काळात इथं भाविकांची सतत वर्दळ सुरू आहे. भव्यता आणि पर्यावरणपूरकता यांचा सुंदर मिलाफ म्हणजेच 'विघ्नहर्ता गणेश मंडळाचा बाप्पा' अशी एक खास ओळख यंदा जालन्याच्या गणेशोत्सवात तयार झाली आहे.

## संक्षिप्त...

### बांगलादेशींवर कठोर कारवाई करा, सिल्लोड प्रकरणात चौकशी करा किरीट सोमय्या यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/सिल्लोड/प्रतिनिधी:** जळगाव शहरात सापडलेल्या बांगलादेशी नागरिकांवर कठोर कारवाई करण्याची व सिल्लोड हल्ला प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केली आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, पोलिसांनी न्यायाधीशाची भूमिका घेऊ नये आणि बोगस कागदपत्रांच्या आधारे भारतीय नागरिकत्व मिळवू पाहणाऱ्यांवर कडक कारवाई झालीच पाहिजे.

सोमय्या म्हणाले की, ''जळगावमध्ये ४३ बांगलादेशी नागरिक मिळाले आहेत. त्यांच्यावर घटनात्मक कठोर कारवाई झाली पाहिजे. मात्र, पोलीस यामध्ये कोणतीही ठोस कारवाई करत नाहीत. याबाबत मी मंत्रालयात, डीजी आणि जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे आग्रही मागणी केली आहे.''

त्यांनी पुढे सांगितले की, ''पोलिस या गोष्टी मान्य करत नाहीत. मात्र पोलिसांनी न्यायाधीशाची भूमिका घेण्याचा प्रयत्न करू नये. बोगस बांगलादेशी नागरिकत्व घेणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे, अन्यथा मला यासंदर्भात थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलावे लागेल.''

दरम्यान, सिल्लोड हल्ला प्रकरणावरूनही सोमय्या यांनी पोलिसांवर नाराजी व्यक्त केली. ''माझ्यावर हल्ला होण्याची माहिती इंटेलिजन्स ब्युरोकडून आधीच देण्यात आली होती. तरीही सिल्लोडचे पोलिस अधिकारी गाफील राहिले,'' असा गंभीर आरोप त्यांनी केला.

या संपूर्ण प्रकरणावर राज्य सरकार व पोलिस प्रशासन काय भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ठाण्यातील चेक नाका येथे कडेकोट पोलिस बंदोबस्त




दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी:** मुंबई उच्च न्यायालयाने मराठा आरक्षणासाठी सुरु असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारला स्पष्ट निर्देश दिले आहेत की, आंदोलकांना ठाणे हद्दीत म्हणजेच मुंबईच्या प्रवेशबिंदूंवर (एंट्री पॉइंट) गाड्या उभ्या करण्याची परवानगी द्यावी. मात्र, त्यांना गाड्या मुंबई शहराच्या आतील भागात आणू दिल्या जाऊ नयेत, असे कोर्टाने स्पष्ट केले आहे. या आदेशानंतर ठाण्यातील महत्त्वाच्या चेक नाका परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मुंबईकडे येणाऱ्या व जात असलेल्या प्रत्येक वाहनाची तपासणी करूनच त्यांना पुढे जाण्याची परवानगी दिली जात आहे. विशेषतः मराठा आंदोलनाशी संबंधित वाहनांवर अधिक लक्ष ठेवण्यात येत आहे. मुंबई आणि ठाणे यामधील सीमारेषांवर विशेषतः चेक नाका, मुलुंड टोल नाका, आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. काही ठिकाणी वाहतूक संथ गतीने सुरू असून नागरिकांना अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे की, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी ही उपाययोजना करण्यात आली आहे.



## श्री सिद्धिविनायक सार्वजनिक मंडळ मोठेगावचा आदर्श उपक्रम



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी:** यंदा श्री सिद्धिविनायक सार्वजनिक मंडळ, मोठेगाव यांनी तरुण पिढीच्या पुढाकाराने एक गाव, एक गणपती ही संकल्पना यशस्वीरित्या राबवून एक आदर्श उदाहरण निर्माण केले आहे. यावर्षी प्रथमच हा निर्णय घेण्यात आला असून, संपूर्ण परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे. तरुणांनी पुढाकार घेऊन याला गावकऱ्यांची साथ लाभली आहे दरवर्षी गणेशोत्सवात अनेक लहान-मोठी मंडळे आपापल्या विभागात गणपती बसवत असत. यामुळे वर्गणी गोळा करण्यापासून ते मिरवणुकीपर्यंत अनेक ठिकाणी स्पर्धा आणि तणावाचे वातावरण निर्माण होत होते. यावर तोडगा म्हणून गावातील तरुणांनी पुढाकार घेत एक गाव, एक गणपती या संकल्पनेची मांडणी केली. त्यांनी गावातील सर्व गणेश मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. तरुणाईच्या या सकारात्मक भूमिकेचे गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले आणि एकजुटीने हा निर्णय घेतला.

**सामाजिक बांधिलकीचा गणेशोत्सव**

या निर्णयामुळे यंदा मोठ्या गावात अत्यंत शांत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात गणेशोत्सव साजरा होत आहे. एकाच ठिकाणी गणपती बसवल्यामुळे सर्व गावकऱ्यांना एकत्र येऊन पूजा-अर्चा आणि आरतीमध्ये सहभागी होता येत आहे. या गणेश मंडळातर्फे केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपत दहा दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण यांसारख्या सामाजिक कार्यांचा समावेश होता.

**विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचा उत्साह**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असून.या उपक्रमांना विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला.

**एकतेचा संदेश**

एकत्रित वर्गणीतून वाचलेल्या पैशांचा वापर मंडळाने सामाजिक कार्यासाठी करण्याचा निर्णय घेतला आहे. या निधीतून गावातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे किंवा गावातील स्वच्छता अभियान राबवणे असे उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. श्री सिद्धिविनायक सार्वजनिक मंडळाचा हा निर्णय गावातील एकतेचे प्रतीक बनला असून, आगामी काळात इतर गावांनीही यातून प्रेरणा घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## दिग्दर्शक अनुराग कश्यपनं निशांचीतील प्रमुख कलाकार ऐश्वर्य ठाकरेचं केलं कौतुक

**मुंबई /प्रतिनिधी:** दिग्दर्शक अनुराग कश्यप यांनी बॉलिवूडमध्ये अनेक चित्रपटांची निर्मिती केली आहे. सध्या ते त्यांचा आगामी चित्रपट निशांचीमुळं चर्चेत आहे. या चित्रपटामध्ये स्मिता ठाकरे यांचा मुलगा आणि शिवसेना संस्थापक बाळ ठाकरे यांचा नातू ऐश्वर्य ठाकरे दिसणार आहे. ऐश्वर्य या चित्रपटाच्या माध्यामातून चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. आता ऐश्वर्य ठाकरे देखील त्याच्या पहिल्या चित्रपटासाठी खूप उत्सुक आहे. अलीकडेच एका मुलाखतीत निशांची चित्रपटाचे दिग्दर्शक अनुराग कश्यप यांनी ऐश्वर्य ठाकरेचं कौतुक केलं आहे.

## मुंबईतील आंदोलकांसाठी शिदोरी कोल्हापुरातून रवाना



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर /प्रतिनिधी:** मुंबईतील आझाद मैदानावर सुरु असलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आंदोलकांसाठी रसद व अन्नधान्याचा पुरवठा केला जात असून, कोल्हापूर जिल्ह्यानेही या उपक्रमात पुढाकार घेतला आहे.

कोल्हापूर येथील मराठा समाज, ब्राह्मण समाज आणि अयोध्या फाउंडेशनच्या वतीने आंदोलकांसाठी अन्नधान्याची मोठ्या प्रमाणावर तयारी करण्यात आली आहे. दररोज २००० हून अधिक आंदोलकांना जेवण देण्याचा संकल्प या संस्थांनी केला असून, त्यानुसार अन्नधान्य आणि आवश्यक वस्तू घेऊन एक मोठा जत्था मुंबईकडे रवाना झाला आहे.

या उपक्रमात कोल्हापूरकरांचा मोठा सहभाग असून, अनेक स्वयंसेवक स्वतः पुढे येऊन आंदोलनात रसद पुरवठा करण्यासाठी मदत करत आहेत. अन्नधान्य, भाजीपाला, पाण्याच्या बाटल्या, आणि स्वयंपाकासाठी लागणाऱ्या इतर सर्व वस्तूंचा समावेश या शिदोरीत आहे.

हे आंदोलन केवळ एका समाजासाठी नाही, तर न्यायासाठी आहे. आम्ही समाज म्हणून या लढ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. मुंबईतील बांधव उपाशी राहू नयेत, म्हणून कोल्हापुरातून ही शिदोरी पाठवली आहे.''

उत्तम पाटील (अध्यक्ष, अयोध्या फाउंडेशन) म्हणाले: अन्नदान हे श्रेष्ठ दान मानले जाते. जे लोक आपल्या हक्कासाठी लढत आहेत, त्यांना अन्नपुरवठा करणे ही आमची सामाजिक जबाबदारी आहे. आम्ही हे कार्य सातत्याने करत राहू.''


कोल्हापुरातून आलेल्या या मदतीमुळे मुंबईतील आंदोलकांना मोठा दिलासा मिळणार आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातून असे सहकार्य मिळत असल्याने, हे आंदोलन अधिक व्यापक आणि बळकट होत चालले आहे.

## जय किसान गणेश मंडळ धारूर: जुन्या सायकलच्या भागांतून साकारला पर्यावरणपूरक गणपती एक प्रेरणादायी उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**धारूर/प्रतिनिधी:** धारूर शहरातील कसबा भागातील मठ गल्लीत गेल्या सहा दशकांपासून उत्साहात साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाला यंदा एक वेगळी आणि प्रेरणादायी दिशा मिळाली आहे. जय किसान गणेश मंडळाने यंदा जुन्या सायकलच्या टाकाऊ भागांपासून पर्यावरणपूरक गणपती साकारून जिल्ह्यभरातून कौतुक मिळवले आहे.

पारंपरिकतेला नवी दिशा पर्यावरण रक्षणाची प्रेरणा: सद्यस्थितीत सण-उत्सवांमध्ये पर्यावरणपूरकतेकडे वाढता कल असतानाच जय किसान मंडळाने प्रत्यक्ष कृतीतून समाजापुढे एक आदर्श ठेवला आहे. मूर्ती तयार करताना प्लास्टर ऑफ पॅरिस, रंग व इतर रासायनिक घटक टाळून जुन्या सायकलच्या भागांपासून गणेशमूर्ती बनवण्यात आली आहे.





**या मूर्तीत**

टायरचे कव्हर शरीराचा ढाचा
पत्र्यापासून सोंड
चाक पोट
सीट डोके व टोप
ब्रेक कांड्या हात
चैन माळा
पैंडल डोळे

अशा विविध भागांचा कल्पक वापर करण्यात आला असून, मूर्ती पूर्णपणे विघटनशील व पुनर्वापरयोग्य साहित्यांतून साकारली गेली आहे.

**महिलांच्या सहभागाची दिलासादायक नोंद**

या वर्षीच्या गणेशोत्सवाची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे मंडळाच्या व्यवस्थापनात महिलांना दिलेली मोलाची जबाबदारी. एकीकडे पर्यावरणपूरक मूर्तीची निर्मिती, तर दुसरीकडे महिलांना केंद्रस्थानी आणून समाजात लिंगसाम्याचे भान जागवणारा हा उपक्रम स्तुत्य ठरत आहे.

**६० वर्षांची परंपरा, नाविन्यपूर्णतेचा वारसा**

जय किसान गणेश मंडळ धारूर येथील एक जुने, प्रतिष्ठित मंडळ असून, ६० वर्षांहून अधिक काळ गणेशोत्सव साजरा करत आहे. मात्र पारंपरिकतेवर अडून न राहता त्यांनी वेळोवेळी नवे उपक्रम राबवत सामाजिक भान जपले आहे.

**सर्वत्र कौतुक आणि प्रोत्साहन:**

या उपक्रमाचे स्थानिक तसेच जिल्हा पातळीवरून मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले आहे. पर्यावरण रक्षणासाठी तसेच सेंद्रिय गणेशोत्सवाचा आदर्श घालून देणारे हे मंडळ भविष्यात इतर मंडळांसाठीही प्रेरणास्थान ठरणार आहे.

जय किसान गणेश मंडळाचा हा अभिनव उपक्रम केवळ पर्यावरणपूरकता नव्हे, तर सामाजिक जाणीवेचाही उत्कृष्ट नमुना ठरतो. ''वास्तविक बदल करायचा असेल, तर तो आपल्यापासूनच सुरू करावा लागतो'' हे या मंडळाने आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

## विविध वृत्त...

### भा. मा. कन्या शाळेची विद्यार्थिनी कृष्णाली खोडके राज्यस्तरीय ज्ञान स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम तर राज्यातून तृतीय



**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी:** येथील भारत माध्यमिक कन्या शाळेची विद्यार्थिनी कु. कृष्णाली प्रकाश खोडके ही राज्यस्तरीय श्रीमद् भागवत गीता ज्ञान स्पर्धेमध्ये राज्यातून तृतीय तर वाशिम जिल्ह्यातून प्रथम आली आहे या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून २५००० तर वाशिम जिल्ह्यातून २३५० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

मागील आठवड्यात २८ ऑगस्ट रोजी बुलढाणा येथे अखिल भारतीय श्रीकृष्ण प्रबोधन परिषदर बुलढाणा द्वारे श्रीमद् भागवत गीता ज्ञान स्पर्धा परीक्षेचे राज्यभरातून आयोजन करण्यात आले होते या ज्ञान स्पर्धा परीक्षेला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला राज्यातून पंचवीस हजार तर वाशिम जिल्ह्यातून २३५० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते ही परीक्षा लेखी स्वरूपाची असून श्रीमद् भागवत गीतेवर आधारित होती त्यामध्ये भारत माध्यमिक कन्या शाळेची विद्यार्थिनी कुमारी कृष्णाली प्रशांत खोडके हिने महाराष्ट्रातून तृतीय क्रमांक तर वाशिम जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवून भारत माध्यमिक कन्या शाळेचे नाव राज्यभर उज्वल केले आहे कृष्णाली हिला ७०१ रुपये रोख बक्षीस व प्रमाणपत्र देऊन लोणारकर बाबा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले याप्रसंगी माजी मंत्री राजेंद्र शिंगणे व शेतकरी नेते रविकांत तुपकर उपस्थित होते याचबरोबर मार्गदर्शक म्हणून शाळेच्या प्राचार्या मंजुषा देशमुख व संस्कृत विषयाचे मार्गदर्शक वसंत बुंधे यांना सुद्धा उपस्थितांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले .

### डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला विद्यापीठाच्या कार्यकारी सदस्यपदी आ.अमित झनक

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी:** डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला विद्यापीठाच्या कार्यकारी परीषदेवर महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य तथा रिसोड-मालेगांव मतदारसंघाचे आमदार अमित सुभाषराव झनक यांची नुकतीच कृषी विभाग महाराष्ट्र राज्याचे सचिवालयाच्या माध्यमातून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे मतदारसंघासह,राज्यातील शेतीला बळकटी मिळणार आहे, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांच्या माध्यमातून कृषी शिक्षण,संशोधन आणि विस्तार या क्षेत्रातील विकासात्मक कामे केली जातात. ज्यामुळे विदर्भातील आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात सुधारणा होण्यास मोलाचे सहकार्य मिळते,त्याच बरोबर विद्यापीठ पदवी,पदव्युत्तर आणि डॉक्टरेट स्तरावरील कृषी अभ्यासक्रम चालविले जातात आणि कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान आणि ज्ञानाचा प्रसार करण्यात येतो,या विद्यापीठाच्या माध्यमातून विविध कृषी अभ्यासक्रम चालवीले जातात.उदा.कृषीपदवी,पदव्युत्तर आणि डॉक्टरेट स्तरावरील शिक्षणाने कृषी क्षेत्रातील तज्ञांची निर्मिती होते.या विद्यापीठातुन कृषी क्षेत्रातील नवीन संशोधन आणि तंत्रज्ञानाचा विकास करण्यात येतो की शेतीची उत्पादनक्षमता वाढेल.त्याच प्रमाणे या विद्यापीठातुन शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील नवीन ज्ञान आणि तंत्रज्ञानाबद्दल माहिती देण्याचे काम करण्यात येते.यामध्ये विविध प्रदर्शने,मार्गदर्शन कार्यक्रम आणि कार्यशाळा यांचा समावेश असतो. त्याच प्रमाणाने शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करण्या संदर्भात या विद्यापीठाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती शिकवुन आणि आवश्यक माहिती पुरवीत त्यांचे सक्षमीकरण करते, ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत मिळते,या विद्यापीठाचे महत्त्व म्हणजे हे विद्यापीठ विदर्भात कृषी शिक्षणाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे.या विद्यापीठाने शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या विकासात मोठी भुमिका बजावली आहे.या विद्यापीठाला देशातील सर्वोत्तम कृषी विद्यापीठांपैकी एक म्हणुनही स्थान मिळाले आहे.त्यामुळे आ.अमित झनक यांच्या निवडीने रिसोड-मालेगांव मतदारसंघातील शेतीला आधुनिकतेची जोड लागणार आहे.

### 'त्यांची लढाई आरक्षणासाठी असली तरी...' अमित ठाकरेंचे मनसैनिकांना आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी:** मनोज जरांगे यांच्या नेतृत्त्वाखाली मराठा समाजाने आंदोलनाची हाक दिली आणि या आंदोलनाचा चौथा दिवस उजाडला तरीही परिस्थिती मात्र सुधारल्याचे पाहायला मिळाले नाही. उलटपक्षी मोठ्या संख्येने मुंबईत मराठा आंदोलकांचे येण्याचे सत्र सुरूच असल्या कारणानं स्थानिक मुंबईकरांसह शहरात नोकरीसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

तिथे मराठा आंदोलकांकडून आपल्या खाण्यापिण्याची आबाळ होत असल्याचा आक्रोश केल्याचं पाहता काही नेत्यांनी या आंदोलकांसाठी मदतीचा हात पुढे केला.

# डोणगावमध्ये महालक्ष्मीचे भव्य स्वागत, खंडारे कुटुंबीयांच्या देखाव्याने भाविकांची मने जिंकली

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी:** डोणगाव येथील खंडारे कुटुंबीयांनी महालक्ष्मी पूजनानिमित्त आपल्या घरी साकारलेल्या भव्य आणि पारंपरिक सजावटीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. शैलेश सुरेश खंडारे यांच्या घरी दरवर्षीप्रमाणे यंदाही महालक्ष्मी पूजन अत्यंत भक्तिभावाने व उत्साहात साजरे करण्यात आले. विशेष म्हणजे, यंदाचा देखावा सामाजिक आणि धार्मिक संदेश देणारा ठरला.

**पारंपरिकतेचा अनोखा संगम**

खंडारे कुटुंबीयांनी यावर्षी ''ग्रामीण संस्कृतीतील महालक्ष्मी पूजन'' या संकल्पनेवर आधारित देखावा साकारला होता. गाभाऱ्यात महालक्ष्मी देवीची मनोहर मूर्ती, पारंपरिक रांगोळी, आकाशकंदील,



फुलांची आरास आणि घरगुती पूजेचे सुंदर साजिरे वातावरण पाहायला मिळाले. सजावटीसाठी पारंपरिक



वेशभूषा आणि हस्तकला वस्तूंचा वापर करण्यात आला होता.

**सणाचा जल्लोष**

आणि भक्तिभाव एकत्रित महालक्ष्मी पूजनाच्या निमित्ताने खंडारे कुटुंबीयांच्या घरी सकाळपासूनच भाविकांची रेलचेल पाहायला मिळाली. महिलांनी नऊवारी साडीत, तर पुरुषांनी धोतर-कुर्त्यात देवीचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. मंगलाष्टके, उखाणे, गाण्यांचे सादरीकरण आणि आरतीचा जयघोष यामध्ये भक्तिमय वातावरण तयार झाले.

**नैवेद्य आणि विशेष प्रसाद**

देवीला पुरणपोळी, साखरभात, बटाट्याची भाजी, कटाची आमटी आदी पारंपरिक महाराष्ट्रीयन पदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. तसेच, उपस्थित भाविकांसाठी प्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते.

**सामाजिक ऐक्याचाही संदेश**

या उत्सवामध्ये डोणगावमधील अनेक शेजारी, नातेवाईक, मित्र-मैत्रिणींनी सहभाग घेतला. स्त्रियांसाठी स्नेहमेळावा, हलकेफ ुलके सांस्कृतिक कार्यक्रम, लहान मुलांसाठी खेळ आणि पारितोषिकांचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने गावामध्ये एकोप्याचे वातावरण निर्माण झाले.

**शुभेच्छा आणि आभार**

खंडारे कुटुंबीयांनी सर्व भाविकांचे स्वागत करत महालक्ष्मी पूजनाचा हा उत्सव भविष्यातही अशाच उत्साहात साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## पैगंबर जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात १११ रक्तदात्यांचा सहभाग



**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड/प्रतिनिधी:** ज्याने एका व्यक्तीचे प्राण वाचविले, त्याने संपूर्ण मानवतेचे प्राण वाचविले या मानवतावादी संदेशाला अनुसरून युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्र या युवा संघटनेच्या वतीने पैगंबर हजरत मोहम्मद (स.अं.) यांच्या ईद मिलाद (पैगंबर जयंती) निमित्त उमरखेड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. दिनांक ३१ ऑगस्ट, रविवार रोजी सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत आठवडी बाजार परिसरात आयोजित या शिबिरात एकूण १११ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेची सेवा केली. या शिबिरामध्ये क्रिसेंट रक्तपेढी, नांदेड यांनी रक्त संकलनाचे कार्य केले.

उद्घाटन व मान्यवरांची उपस्थिती:

या शिबिराचे उद्घाटन डॉ. विवेक पत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी जमाते इस्लामी हिंदचे अध्यक्ष काझी जहीरुद्दीन, डॉ. मोहसीन अली, रसूल पटेल, डॉ. प्रफुल्ल वानखेडे, डॉ. आशिष खांबाळकर, डॉ. शाम दळवी, डॉ. शुभम इंगळे, अजिमउल्ला खान, कलीम खान, आयाज मुजावर, सोनू खतीब आदी मान्यवर उपस्थित होते.

रक्तदानाचे महत्त्व:

या प्रसंगी बोलताना डॉ. विवेक पत्रे यांनी सांगितले की, ''रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. एका रक्तदात्यामुळे तीन रुग्णांचे प्राण वाचू शकतात. महाराष्ट्रात दररोज ३०००-५००० युनिट रक्ताची गरज भासते, जी अशा शिबिरांच्या माध्यमातूनच पूर्ण होऊ शकते.

पैगंबरांच्या शिकवणीप्रमाणे मानवतेची सेवा करत रक्तदान शिबिराचे आयोजन ही एक प्रेरणादायी कृती असल्याचे मत उपस्थित वक्त्यांनी मांडले.

यशस्वी आयोजनामागे कार्यकर्त्यांचा हातभार:

या शिबिराचे यशस्वी आयोजन सोहेल खान (स्थानिक अध्यक्ष)



यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. त्यांच्या सोबत साबिर नाईक, शाहिद खान, फैजान खान, अजीम अली, माजिद खान, जुबेर खान, आसिफ अली, आलम खान सर, उमैर खान, सरफराज आलम, मोहम्मद शामीर मुजावर, सलमान खान आदी कार्यकर्त्यांनी अथक मेहनत घेतली.

## बुलडाणा नगर परिषदेची प्रभाग रचना नियमबाह्य : ॲड.जयश्री शेळके

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा /प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नगरपरिषदेची प्रभाग रचना करणे अपेक्षित असतानाही बुलडाणा नगर परिषदेने तयार केलेली प्रभाग रचना ही नियमबाह्य व नागरिकांच्या हिताला बाधक असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी केला आहे. या संदर्भात ॲड.जयश्री शेळके यांनी नगर परिषदेकडे लेखी आक्षेप नोंदविला आहे. त्यांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नव्याने सुस्पष्ट, न्याय्य व सुयोग्य प्रभाग रचना जाहीर करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

शासनाच्या आदेशानुसार प्रभाग रचना उत्तर दिशेकडून सुरू करून सलग क्रमाने करणे अपेक्षित होते. मात्र बुलडाणा नगर परिषदेने ही प्रभाग रचना वायव्य दिशेपासून सुरू केली असल्यामुळे भौगोलिक सलगता भंग झाली आहे. नैसर्गिक सीमा जसे की नदी, महामार्ग, रेल्वे मार्ग, प्रमुख रस्ते यांचा विचार न करता प्रभाग ठरवण्यात आल्याने अनेक ठिकाणी विभागणी गोंधळात टाकणारी ठरली आहे. प्रभागांची सीमा नागरिकांना समजेल अशा लँडमार्कऐवजी शेत सर्वे नंबरवर आधारित ठेवण्यात आल्याने प्रभाग रचना अधिकच अस्पष्ट झाली आहे.

याशिवाय, विदर्भ हाऊसिंग सोसायटीसारखी एकसंध वस्ती मुद्दाम दोन प्रभागांत विभागण्यात आल्याचा



आरोप करण्यात आला आहे. अनुसूचित जाती-जमातींच्या वस्त्यांचे अन्यायकारक विभाजन करून त्यांचे मतदारसंघ हेतुपुरस्सर विभाजित केले असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. लोकसंख्येचे संतुलन न पाळता, नागरिकांच्या सोयीसुविधांचा विचार न करता नगर परिषदेकडून मनमानी पध्दतीने सदर प्रभाग रचना झाल्याचे दिसून येत असल्याचे ॲड. जयश्री शेळके यांनी सांगितले.

''ही प्रभाग रचना स्थळ निरिक्षण न करता बसल्या ठिकाणी कागदोपत्री करण्यात आली आहे. नागरिकांचा, मतदारांचा गोंधळ वाढवून विशिष्ट राजकीय पक्षाला, व्यक्तीला फायदा व्हावा या उद्देशाने हेतूपुरस्सरपणे सदरची प्रभाग रचना करण्यात आलेली आहे. सदर प्रभाग रचना रद्द करून शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नव्याने व न्याय्य पद्धतीने प्रभाग रचना करण्यात यावी,'' अशी ठाम मागणी ॲड. जयश्री शेळके यांनी केली आहे.

## रिसोड पोलिसानची आठ दिवसात तिसरी धडाकेबाज कारवाई, १,९६,५००/-रुपयाचा मुद्देमाल हस्तगत

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी:** रिसोड पोलीसांनी आठ दिवसात तिसरी धडाकेबाज कारवाई करत वृद्धास लुटणाऱ्या चार इसमाना अटक करून एक अन्य विधी संघर्ष बालक असे पाच जनाविरोधात कारवाई केली आहे.

याबाबत माहिती अशी की,पोलीस स्टेशन रिसोड येथे दिनांक २४ ऑगस्ट रोजी ११ वा. सुमारास एक वृद्ध मांगवाडी येथुन रिसोड येथे बँकेचे कामाकरिता आले होते. बँकेचे काम करुन परत रात्री ८ वाजता सुमारास मांगवाडी घरी जाणे करिता लोणी फाटा रिसोड येथे थांबले असता एका मोटारसायकलवर दोन ईसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षाचे तक्रारदार जवळ आले व वृद्धास म्हणाले कुठे जायचे आहे. मांगवाडीला जायचे आहे असे वृद्धाने सांगीतले. सदरआरोपींनी आम्ही मांगवाडीला चाललो तर तुम्हाला मांगवाडीला सोडतो असा विश्वास दाखवुन त्यास त्यांनी मोटार सायकलवर बसविले. मागंवाडी कडे निघाले. त्यांचे मोटार सायकलच्या मागे एक दुसरी मोटार सायकल येत होती त्यावर तीन ईसम बसले होते ते मागे मागे येत होते.रात्री ०८/१५ वाजता सुमारास मेहकर फाटा रिसोड येथे बाजुला अंधारात त्यांनी मोटारसायकल थांबविली व मागुन येत असलेली मोटार सायकल सुध्दा तेथेच जवळ येवुन थांबली. सदर वृद्धास ज्या मोटार सायकलवर बसवले होते त्यावरील मागचा ईसम खाली उतरला व वृद्धास सुध्दा गाडी वरुन खाली उतरविले व चाकुचा धाक दाखवुन जिवाने मारण्याची धमकी देवुन त्यांचे खिशामधील ६०००/- रुपये जबरदस्तीने हिसकावुन घेतले व सर्वांनी घेराव टाकुन धमकी दिली . अशा फिर्यादीच्या तक्रारी वरुन पोलिसांनी विविध कलमान्वये दरोड्याचा गुन्हा दाखल असुन सदर प्रकरणी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी सखोल तपास करण्याचे आदेश दिले वरुन सपोनि शिवचरण डोंगरे व स्टाफने आधुनिक व तांत्रीक पध्दतीने तपास करुन आरोपीची नावे गजानन विश्वनाथ राउत वय २० वर्ष रा.रिसोड,करण विलास पंडीत वय २२ वर्ष रा. गैबीपुरा रिसोड,मंगेश मदन राजुरकर वय ३० वर्ष, विजय शिवाजी सानप वर्ष दोन्ही रा.आनंदी नगर रिसोड व एक विधी संघर्ष बालक असे निष्पन्न झाल्याने यातील ४ आरोपींना ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन नगदी ६०००/- रुपये व एक चाकु किंमत ५००/- रुपये तसेच गुन्ह्यांत वापरलेल्या दोन मोटार सायकल किंमत १,९०,०००/- रुपये असा एकुन १,९६,५००/-




रुपयाचा मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातुन जप्त केला आहे.सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक अनुज तारे (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक लता फड (म.पो.से.), सहा.पोलीस अधिक्षक नवदिप अग्रवाल (भा.पो.से.) उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग वाशिम यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरिक्षक. रामेश्वर चव्हाण यांचे नेतृत्वात तपास अधिकारी सहा. पोलीस निरिक्षक शिवचरण डोंगरे, पोलीस अंमलदार पोहेकॉ आशिष पाठक, नापोकों अनिल राठोड, रुपेश मस्के, विश्वास चव्हाण, प्रभु जमडे, राजेश गांगवे, सुशिल इंगळे, अमोल ठाकरे यांनी केली आहे.